
वनफुल
म. म. देशपांडे

# व न फू ल

म० म० देशपांडे

मराठी ग्रंथ संग्रहालय ... शाखा
ग्रं. क्र. 18608

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 38683 दि:
क्रमांक 15558 नों दि. 3/1821 10-8-55

REFBK-0014806

मौज प्रकाशन गृह

मौज प्रकाशन : ११३

पहिली आवृत्ती : १० मे १९६५

© १९६५, सौ० अमिता देशपांडे

किंमत साडेचार रुपये

मुखपृष्ठ :
संभाजी कदम

प्रकाशक :
वा० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

माझे वडील कै० नाना

व ती० आई

यांचे चरणी

अर्पण

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८८६३ वि: का ८५
क्रमांक १५९८ नों. दि. १०-८-६५

# वनफूल


कळत नाही १
पावलें २
अंतरिक्ष फिरलों पण ३
लांब लांब सावल्या ४
कोण? ५
अनोळखी ६
सर्व वावर फुटलं ७
भार ८
माझें मीपण दिसेना! ९
व्यथा १०
उदास ११
पचवून हलाहल १२
तहान १४
जागृतीच्या वृक्षाखाली १५
उगीच १६
रिता १७
सुख! १८
दुपार १९
दुपार २०
आपण २१
आवाजाला नाही साथ २२
संथ २४
सजा २५
मधला मी तडा आहें २६
क्षुब्ध जळाला किनारा २७
धुतलेले डोळे! २८
या गुलाबाच्या २९
संध्याकाळ ३०
सांज ३१
फुलपाखरांचे पंख ३२
संध्यागीत ३३
सरेल ही रात ३४
खुडलेंस तुवां मला ३५
नाही उत्तर देतां येत ३६
पश्चात्ताप ३७
चिंध्या ३८
चिमणी ३९
मनांच्या बंद दारावर ४०

संसार ४१
इवला स्वेटर विणतांना ४२
ज्ञान ४३
नाना पातळ्या मनाच्या ४४
लाख लाख द्वंद्वं ४५
हाक ४६
दिलासा ४७
स्वच्छ जळामध्ये ४८
शांति ४९
जिथं सर्व माझंच आहे ५०
मीच पिसा ५१
मलाहि वाटतं ५२
भरजर ५३
प्रेम केलें कुणीं ५४
हे रस्ते सुंदर ५५
संगमावर ५६
साक्षि उद्याच्या ५७
महाद्वार ५८
यावें ऋतुराज ५९
हा बहर फुलांचा ६०
सौम्य मृदु बहार ६१
पळसवन हुशार ६२
वनफूल ६३
येरझारा ६४
मासे ६५
वस्ती कशी सुबक सुंदर ६७
यात्रा ६८
चिंतक ६९
अजून काय झालं ७०
अशांत वारा ७१
नाच ७२
तूंही तूंही तूंही ७३
परत ७४
अभिवादन ७५
भ्रम ७६
सूर्याचीं पिलें हीं ७७
सुखाचे सोबती ७८
रथा जुंपिलों मी ७९

❀ वनफूल

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८७८३ वि: काव्य
क्रमांक २५६७ नों दि: १०-८-६५

## कळत नाही

छातीवर दगड जरी ठेवला
तरी हीं हिरवीं पानें
कुठून फुटतात कळत नाही.

कितीहि म्हटलें की मी सुखी आहें
तरी माझ्या गीतांतून
मन कां रडतें कळत नाही.

कुणा अव्यक्ताशीं माझें नातें जडलें आहे
म्हणून मी माझा नाही,
आणि सये, तुझाहि नाही.

छातीवर दगड जरी ठेवला
तरी हीं हिरवीं पानें
कुठून फुटतात कळत नाही.

२४८०६
मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 38683 दि:
क्रमांक २५६८ नों दि: ७१०५
१०-८-६

## पावलें

हीं पावलें कुठे बरें जातात ?
मला याचा शोध घेऊं दे !

कुठेहि पाहिलें तरी मला पावलेंच दिसतात.
आकाशाच्या निळ्या मुलायम रेतींतसुद्धा
पावलांचे ठसे उमटलेले मी पाहतों.
अगदी दूरवर, जेथवर दृष्टि जाते तेथवर
ती त्यांचा पाठलाग करते.
येथील या हवेंत, वातावरणांत,
तुमच्या-माझ्या बोलण्यांत, हसण्या-रडण्यांत
पावलांचे ठसे उमटलेले मला दिसतात.

कांही पावलांचे ठसे तर माझ्या हृदयांत
मी जतन करून ठेवले आहेत.
त्यांची मी पूजा करतों.
म्हणतों, "कोणत्या वाटांनी तुम्ही गेलांत
सांगा ना मला ! तुमच्या दुःखाचा अंश
माझ्याहि वाट्याला आलेला आहे.
परंतु मला साऱ्या वाटा बंद कां ?"
आवाज येतो, "चल तूंहि चल पावलांबरोबर."

# अंतरिक्ष फिरलों पण

अंतरिक्ष फिरलों पण
गेली न उदासी
गेली न उदासी;
लागलें न हाताला
कांही अविनाशी
कांही अविनाशी !

क्षितिज तुझ्या चरणांचें
दिसतें रे दूर
दिसतें रे दूर;
घेऊनि मी चालुं कसा
भरलेला ऊर
भरलेला ऊर !

जरि वाटे जड कळलें
तळ कळला नाही
तळ कळला नाही;
जड म्हणतें, "माझा तूं."
क्षितिज म्हणे, "नाही."
क्षितिज म्हणे, "नाही."

अंतरिक्ष फिरलों पण
गेली न उदासी
गेली न उदासी !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों दि ...
10

## लांब लांब सावल्या

लांब लांब सावल्या
सैरावैरा धावल्या
एकाएकी हजार तारा
आकाशाला चावल्या !

लांब लांब सावल्या
सैरावैरा धावल्या
अंधाराच्या पाण्यामध्ये
बुडून मरण पावल्या !

लांब लांब सावल्या!

## कोण ?

दिक्कालाच्या प्रचंड घुमटांत
एकटाच असतों तेव्हा मी पुकारतों :
"कुठे आहेस ?"
तेच शब्द सर्व बाजूंनी प्रतिध्वनित होतात :
"कुठे आहेस ?"
"कोण ?"
पुन्हा तेंच : "कोण ?"
प्रतिध्वनींनी हवेचा कण न् कण निनादतो
खरोखर मला कोण हवें असतें ?

## अनोळखी

अनोळखी मन तिचें
होती एक ती सडक
हवें त्याला गाठते जी
इच्छेसारखी तडक.

जाणारे होते लोक
तिच्या जवळ, बाजूला;
तिला रोखूं न शकल्या
त्यांच्या कणव-सावल्या.

तिचें एकाकीपण तें
पण जाणलें न कोणी :
प्रेमावाचूनही जीव
सूड घेतो अभिमानी

नका विचारूं मजला
पुढे तिचें काय झालें ?
इस्पीतळांत मरण
तिला कशामुळे आलें ?

# सर्व वावर फुटलं

" सर्व वावर फुटलं
पऱ्हाटीनं व पांढरं
वेचा लेकी लगबग...
मले दिसतें झावरं !

जल्म गेला वेचण्यांत
आता कंबर वाकली
चार बायांचा कापूस
वेचायाची मी एकली ! "

" नको वेचूं मायबाई
आहे तुले लेकीसुना. "
" माय धरणीचा पोरा
नाही सोडवत पान्हा ! "

## भार

माझा मज भार
माझेंच मी ओझें
वाहें शिरावर !

क्रुश अनिवार
शब्दहि आतला
फुटेना बाहेर !

हासायाचें खोटें
आर्ततेवाचून
रडायाचें खोटें !

दंभाचा पसारा
येथे देवघेव
बोल बोजवारा !

आव्हानाचा आव
जीवनाचा झाला
छंद आविर्भाव !

घालतों रिंगण
आपुल्या भोवती
दुरावलें मन !

असेंच जगणें
आपुल्याच भारें
आपण वाकणें !

## माझें मीपण दिसेना !

अंधारी अंधार
काांही आकळेना :
माझें मीपण दिसेना !

बोल बोलवेना;
अबोला साहीना :
माझें मीपण दिसेना !

गंध गंधवेना;
स्पर्श सुखवेना :
माझें मीपण दिसेना !

जीव जाणवेना;
जड चेतवेना :
माझें मीपण दिसेना !

कांही ऐकवेना;
कांही सांगवेना :
माझें मीपण दिसेना !

# व्यथा

डोळ्यांडोळ्यांतून तरारली व्यथा
कशास हासतां ?
आसू लपवितां ?

गात्रागात्रांतून सांडे विकलता
कशास रेटतां ?
जीवन पेलतां ?

चालीचालीतून वाट तुडवितां
टेकावया माथा
आसरा शोधितां !

शब्दाशब्दांतून मन लपवितां
वृथा गीत गातां
अंतर तुटतां !

अंधारली रात, अंतरांत व्यथा
उजाडेल आता !
उजाडेल आता !

## उदास

आज वाटतें उदास :
झाल्या गेल्या गोष्टींचा ग
मनीं झडला उल्हास !

आज वाटतें उदास :
सुकलेल्या आसवांचा
मनीं दाटला सुवास !

आज वाटतें उदास :
अजूनिया माझे मनीं
तुझा घुटमळे श्वास !

आज वाटतें उदास :
क्षण गळले सुखाचे;
मनीं पाचोळ्याची रास !

आज वाटतें उदास :
गेल्या गोष्टीचा विसर
मुळी पडेना जीवास !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा
अनुक्रम ३८८८३ वि:
क्रमांक ७६६८ नों

# पचवून हलाहल

पचवून हलाहल
अमृताचे बोल ओठीं;
बागा हास्याच्या फुलती
अश्रु-सरितेच्या काठीं.

हिरवळ वरवर,
खाली उकळे धरती;
दाबलेल्या हाताखाली
राहे जखम सलती.

कोणासाठी तरी जीव
हळहळे, तडफडे;
जोडायाचीं नवीं नातीं,
आठवण फडफडे.

उमाळ्याचा उचंबळ
तसा ठेवुनिया पोटीं
फिरवावा ममतेचा
हात इतरांच्या पाठीं.

हेव्यादाव्यांमधे कोठे
विश्वासाचें स्थळ राहे;
साऱ्या गर्दींत एखादी
दृष्टि ओलावून पाहे.

उद्वेगाने पेटे मन:
वाटे फाडावें जीवन;
परी कोणासाठी तरी
जगण्यांत समाधान.

पचवून हलाहल
अमृताचे बोल ओठीं;
बागा हास्याच्या फुलती
अश्रू-सरितेच्या काठीं !

# तहान

सारा अंधारच प्यावा
अशी लागावी तहान;
एका साध्या सत्यासाठी
देतां यावे पंचप्राण.

व्हावें एव्हढें लहान :
सारीं मनें कळों यावीं;
असा लाभावा जिव्हाळा :
पाषाणाचीं फुलें व्हावीं.

सर्व कांही देतां यावें,
श्रेय राहूं नये हातीं;
यावी लावितां कपाळीं
भक्तिभावनेने माती.

फक्त मोठी असो छाती
दुःख सारें मापायाला;
गळो लाज, गळो खंत,
कांही नको झाकायाला

राहो बनून आकाश
माझा शेवटचा श्वास;
मनामनांत उरावा
फक्त प्रेमाचा सुवास !

# जागृतीच्या वृक्षाखाली

जागृतीच्या वृक्षाखाली
स्वप्न-पाकळ्यांचा सडा :
ओठांवर रेंगाळतो
स्पर्श ओठांचा तेव्हढा

हाले काळजाचें पान
येतां झुळूक जराशी;
हळुवार कुजबूज
आता बसली तळाशीं.

उन्हें आलीं वर तरी
गात्रांवर स्पर्श-छाया;
चांदण्यांत न्हाऊनिया
केस वाळवी दुनिया.

स्वप्नसडा भवताली :
दृष्टि धुंडाळिते वाट;
धुकें सरतां समोर
जग उघडे अफाट.

क्षण ओढी पुढे पण
मागे पाठ फिरवेना;
सुख सांडलें जेथे ती
जागा दूर करवेना !

## उगीच

उगीच बोललों
अर्थावीण शब्द,
उगीच राहिलों
क्षणभरी स्तब्ध !

उगीच वाटेंत
अडवून तुला
वेड्यापरी कांही
प्रश्न विचारला !

उगीच हातांत
घेऊनिया हात
ओठीं दाबिला मीं
तेव्हा आवेगांत !

उगीच शिरलों
दोघें आडरानीं,
फिरूनिया आलों
निळया नभांतुनी !

उगीच खुडला
वेलीचा बहर;
उगीच जिभेला
लाविलें जहर !

## रिता

उगा हालवितो चाफा
नसतांना फुलें-पानें;
कसें जमावें आपणां
रित्या मनांनी भेटणें ?

गुणगुणतो स्वतःशीं
शब्द नसलेलें गीत :
आंगवळणीं पडली
रुळलेली जनरीत !

पिऊं पाहतो नीलिमा,
स्वप्न पकडूं पाहतो;
भारावून जातो तर—
असा रिता कां राहतो ?

## सुख !

गीतांतून अंतरंग
जसें ओलेतीचें अंग;
अश्रूंतूनही दिसावा
नयनांचा निळा रंग !

खेळीमेळीचा रुसवा :
व्हावा रंगाचा बेरंग;
पावसांत वितळावे
इंद्रधनुष्याचे रंग !

कुरवाळावें गालाशीं
दुःखाचें सोनेरी पीस;
हितगूज मनांतलें
रात्रीं सांगावें उशीस !

हवेंहवेंसें वाटावें
छळणारें सुख असें;
विसर पाडील असें
जीवाला असावें पिसें !

## दुपार

पिते नीलिमा दुपार पिवळी :
आपुल्याशींच हासते कळी.

सावळ्या छायेंत निजला पांथ;
पाऊलवाटही स्तब्ध, विश्रांत.

पांढरा एकला फिरतो ढग
पाहत खालचें विश्रब्ध जग.

हातांत हात गुंफून सावल्या
बसल्या बुंध्याशीं दावीत वाकुल्या.

पक्ष्याचें जोडपें पानांच्या आड :
फेकतें खडा पोरगें द्वाड.

अशा ह्या दुपारीं एखादी सून
चालली नदीला घेऊन धुणं !

## दुपार

फिरतो आकाशीं पक्षांचा थवा :
दुपार असून हवेंत गारवा.
पिकांनी भरलीं शेतें भोवती;
सख्याची सखीला साद कानीं ती.
हिरव्या धांड्याला कोवळीं कणसें;
खट्याळ ओढ्याला वाटेचे वळसे.
तुरीच्या रांगेंत पिवळीं फुलें;
कापूसबोंड उन्मादें उले.
हिरव्या रानाचें स्वप्न पाहतें
झोपेंत निमग्न झाडींत गाव तें !

## आपण

आपुल्याच अंधारांत,
आपुल्याच एकांतांत,
आपुल्याच दीप्तीसाठी
आपुलीच जळे ज्योत !

आपुल्याच एकांतांत
आपुल्याशी व्यभिचार;
अंगावरून वाहती
जगताचे व्यवहार !

दुसऱ्याच्या डोळ्यांतुनी
आपणाला न्याहाळावें;
सभोवार कल्लोळांत
शब्द आपुले शोधावे !

आपुलाच गळा कधी
दाबुनिया जीव घ्यावा;
आणि आपुल्याच पोटीं
आपणच जन्म घ्यावा !

अशा अंधारीं जगावें
चाचपडत जीवन;
ऐकूं ये ना स्वतःलाच
स्वतःचेंच आक्रंदन !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## आवाजाला नाही साथ

आवाजाला नाही साथ
नाही प्रतिध्वनि जेथे !
अंधारांत नाही वात
काळ्या सावल्याच जेथे !

बने नातेंच बंधन.
भावनेला रूप हवें.
नको निःशब्द स्पंदन;
हवे शब्द नवे नवे !

जग धुकें, मन धुकें;
कोठे, काय, कोण चुके ?
बोट धरून चालवी—
आपुलें नशीब मुकें !

वासना मानून सत्य
काळ्या छाया आलिंगितों !
विवेकाचे नांवावर
कोता स्वार्थच पूजितों !

अर्थवाही शब्द झाला
आज अर्थाचाच दास :
रूपालाच धूप जेथे
कोण पुसे आशयास ?

शकलें जोडून जरी—
उभें राहूं आहों ताठ (!)
आंत आंत कोठे तरी
दुखत राहते गाठ !

# संथ

गति गिळून—
काळही संथ;
          प्रवाह संथ,
          पाऊलें संथ !
जळतें कांही
मुकाट, संथ;
          कळतें तेंही
          गळतें संथ !
साठवलेलें
आटतें संथ;
          आणि उरते
          रिकामी खंत !

## सजा

दुखतच नाही त्याला
दुःख तरी कसें म्हणूं ;
लागतच नाही पाणी—
किती खणूं ? किती खणूं ?

दुःख नाही, इजा नाही,
सुख नाही, मजा नाही;
सजा मात्र अशी कांही
धड जगूं देत नाही.

## मधला मी तडा आहें

माझ्या मनाला नेमका
चुकीचाच अर्थ लागे;
आयुष्याची गुंतावळ :
घट्ट पीळ, जुने धागे !

चुकीच्याच अर्थांवर
उभें घर, उभी भाषा;
नाडीनाडींतून वाहे
एक भुकी अभिलाषा !

घट्ट पीळ तोडायाला
आणूं कोठलें मी बळ ?
अंगावरती अजून
मागल्या जन्मींचे वळ !

जगायाचें आहे मला
म्हणूनीच अर्थ खोटे...
लावूनिया जगतों मी :
झाले भावनेचे गोटे !

अशा जगण्याची चीड :
तीही एक पीडा आहे;
दोन दिशांच्या, काळांच्या—
मधला मी तडा आहें !

# क्षुब्ध जळाला किनारा

क्षुब्ध जळाला किनारा आहे, जरी दूर आ
छातीवर फुटे लाट, बाहुबळ फुटूं पाहे
तरी जगण्याचा मज दुर्दम हव्यास आहे;
सांडो रक्त, तरी नव्या रक्तामधे दम आहे!

चक्काचूर होऊं पाहे हरघडीं जीवनाचा,
आशाआकांक्षेचा आणि मृदु भावनेचा;
सत्य, प्रेम मृगजळ; दाह तप्त वास्तवाचा.
अस्तित्वाच्या पोटीं सुप्त व्यक्तित्वाचा अग्नि आहे!

दिशाहीन मार्ग आहे पायाखाली रुळलेला
आणि संघर्षांत जीव झाला जरी अर्धमेला;
डोळे मिटून प्यायाचा आला पुढे विषपेला
तरी यातनेला कांही सीमा आहे, स्फोट आहे!

# धुतलेले डोळे !

शैशवामधल्या
निर्मळ अश्रूंनी
धुतलेले डोळे
आज नाहीत ग भोळे !
प्राजक्ताचें फूल आज
एक निखारा वाटे
तुझ्याकडे पाहतांना
बोचतात
आज पापणीचे काटे !
यौवनाने पुसलेत अश्रू
कसें शैशव विसरूं ?

## या गुलाबाच्या

या गुलाबाच्या वाळक्या काडीवरून
जरी तूं हात फिरवलास
तरी तिला फुलें येतील अशी तूं !
आणि मी ?
सर्पणासारखा. नुसता जळणारा !
मलाहि फुलें येतात...
पण तीं ठिणग्यांचीं !

## संध्याकाळ

संध्येचा श्यामल हात कोवळा
पकडूं पाहतो
नदीकाठचा उडता बगळा

पुसट पुसट क्षितिज रेषा :
मीलनामधली
दोन जीवांची अस्फुट भाषा !

थकूनभागून
दिवस मिटतो हळूच पापणी;
गालांत हासते शुक्राची चांदणी !

क्षणाक्षणाने दाटतो काळोख;
जुनी एखादी
मनांत सारखी घोळते ओळख !

# सांज

फिकट तांबूस सांज :
दूर देवळांत वाजे आरतीची झांज;
किनाऱ्याशीं बोले लाट
टाकून संकोच, लाज !

पाय मोकळे सोडून पाण्यांत,
हात गुंफून हातांत,
झालें मोकळें हृद्गतः
गंध भरला वाऱ्यांत !

संथ वाहणारें जळ :
उकलले सारे पीळ;
दिसे मनाचाहि आता तळ !

नदीकिनारीं निवांत
असेच बसले राहूं;
सांजेचे बदलते रंग पाहूं !

# फुलपाखरांचे पंख

फुलपाखरांचे पंख
पुस्तकांत खुणेसाठी;
शंखशिंपले वेचिले
मिळूनिया नदीकाठीं.

संध्याकाळ होती तेव्हा
साधीभोळी परकरी;
आज कातरवेळेला
एकटें वाटतें घरीं

# संध्यागीत

कुठलेंसें संध्यागीत
नक्षत्रांना करी जागें;
तुला भेटायाची मला
अशा वेळीं ओढ लागे !

कुठलेंसें संध्यागीत
आळवितें दूर कुणा:
मला दिसती सर्वत्र
तुझ्या बोलावल्या खुणा.

संध्यागीत ऐकूनिया
हळू आला चंद्र वरी
कळलें की पोचलों मी
नकळत तुझ्या घरीं .

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३६६८२ वि: ....
क्रमांक ७५५६ नों. दि:

## सरेल ही रात

खाट टाकून बसावें अंगणीं,
असावा वारा ऐकत बोलणीं;

असावें टिपूर चांदणें शुभ्र,
रेंगाळणारें एखादें अभ्र;

तुझ्या आवडत्या मोगऱ्याचा वास
संथ पावलांनी फिरे आसपास;

कामधाम सारें संपवून तुवां
बसतां जवळ, मधुर थकवा;

आकाशींच्या तारा मोजतां मोजतां,
तुझीया कथा ऐकत पेंगतां—

—कधी लागावा डोळा न कळावें
चंद्राने हळूच ढगांत शिरावें...

## खुडलेंस तुवां मला

खुडलेंस तुवां मला
फुललेल्या गेंदापरी;
नाही ठेविलास प्राण
तोहि म्हणायाला उरीं !

सारें घेतलेंस माझें,
सारें कांही हिरावून;
मागे ठेविली परंतू
एका जखमेची खूण !

माझ्या जखम उरींची
सुख देते चंद्रापरी;
राहिलें न आता मागे
माझें म्हणायाला जरी.

# नाही उत्तर देतां येत

नाही उत्तर देतां येत
काळ्याकुट्ट अंधाराला;
नाही उत्तर देतां येत
चिरस्थायी वेदनेला !

चिरस्थायी वेदनेचें
उत्तर एक अश्रू फक्त;
काळ्याकुट्ट अंधाराचें
उत्तर एक हाक फक्त !

नाही उत्तर देतां येत
घाबरतों गणिताला;
बुद्धाच्याहि डोळां अंतीं
शून्याचाच थेंब आला !

नाही उत्तर देतां येत;
वेदनाच बरी आता :
विचारून पाहीन मी
मृत्यूलाच जात जात !

## पश्चात्ताप

जाणिवेच्या घाटावर अंधारांत
धुवायला येतात पापें अपुलें अंग.
भांडतात आपसांत,
"मला हवा पश्चात्ताप."
"मला हवा पश्चात्ताप."

आवडतें माझें पाप
अंग चोरून असतें मागे कोठेतरी चुपचाप
ढकलून इतरांना
गफलतींत खाली, खोल...
एकटेंच घाटावर करीत बसतें पश्चात्ताप
आणि माझ्या डोळ्यांतून येतें पाणी
(खरें खोटें).

## चिंध्या

जगतोस त्याच्या उरती चिंध्या
मनांत फक्त.
जपून ठेव.
कामीं येतात
पुसायाला
आपुल्या नि इतरांच्याही
जखमांमधलें
अमोल रक्त!

# चिमणी

चिमणीने खोपा केला
माझ्या मनांत
काडी काडी जमवून;
तेव्हापासून वेळ माझा
जातो सारा
चिमणीच्या संसारांत.

सुखदुःख जगांतलें
फिरूनिया दूरदूर
उचलून चोचीने ती
घेऊन येते पिलासाठी.

माझासुद्धा इवलासा जीव जगे
चिमणीने आणलेल्या
चाऱ्यावर.

# मनांच्या बंद दारांवर

मनांच्या बंद दारांवरच
उभे असतों एकमेक...

बंद दारासमोरील
पायरीवर बसूनच
शहरांतील शेजाऱ्यांगत
बोलत असतों...
म्हणूनच फसत नि फसवीत असतों.

तुझ्यांतील कोणीतरी
बाजूच्याच खिडकीच्या गजांतून
पाहत असतें न्याहाळून.
माझ्यांतील कोणी आंत
दारालाच कान देऊन उभें असतें...

...मनांच्या बंद दारांवरच
उभे असतों असेच बोलत
जन्मभर!

## संसार

चार पोटांसाठी
जगे एक पोट,
संसाराची मोट
ओढी सदा !

पोटांतून एका
जन्म घेती पोटें;
त्यांचे सुके ओठ
बघवेना !

कचेरीचें काम :
निघे सारा घाम;
'पहिलीच' दाम
गिळी सारा !

औषधाची शिशी
आजाऱ्याची खाट;
असूनिया हाट—
नसे भाजी !

काचेच्या बांगड्या,
विटकें नेसूंचें;
खोचुनी पदर
साथीला तू !

## इवला स्वेटर विणतांना

इवला स्वेटर विणतांना
मधुन हासतेस तूं;
मधुन नयन भरून पाहतां
गर्द सावलीच वाटतेस तूं!

हळु पाऊल टाकीत चालतां,
हळु बोलुन मज कांहि सांगतां
मूर्तिमंत चाहूलच तूं!

बागेंतिल कुरवाळित सुमनें,
पक्षांवर लावून लोचनें—
बसलेली पाखर तूं!

## ज्ञान

मार खाऊन परत येतें माझें ज्ञान,
म्हणतें की, "चुकलों मी."
हात टेकून म्हणतों मी,
"थकलों मी.
तुझी काय करूं कीव
जेथे माझ्याच अंगीं आहे भरलें हीव."

## नाना पातळ्या मनाच्या

नाना पातळ्या मनाच्या
आणि चढायाला जिने :
वर वर जावें तसे
हातीं येतात खजिने.

नाना पातळ्यांवरून
नाना जगांचीं दर्शनें :
उंचीवरून बघतां
दिसे अमर्याद जिणें.

उंच पातळीवरून
दिसतात स्पष्ट वाटा :
वर जावें तसा होतो
आपोआप नम्र माथा.

नाना पातळ्यांवरती
नाना लढतों मी रणें;
होतां विजयी, बांधितों
दारावरती तोरणें !

## लाख लाख द्वंद्वें !

लाख लाख द्वंद्वें,
लाख वेळा मृत्यू;
लाख जन्मांतुनी
उठतों परंतू !

लाख लाख द्वंद्वें
आंत उरांतलीं;
लाख लाख द्वंद्वें
आंत-बाहेरलीं !

द्वंद्वांतुनी जातां
भोगतों यातना;
जीवनाचें सारें
सारच यांत ना !

लाख लाख द्वंद्वें,
लाख वेळा मृत्यू;
लाख जन्मांतुनी
उठतों परंतू !

## हाक

दुरून कुठून तरी हाक येते.
(माझ्यांतूनच येते ती)
म्हणते की वर ये.
वर ये तूं आपल्यांतून,
आपल्या तूं चिखलांतून वर ये.
दैनंदिन जीवनाचें गतिचक्र
आकार देतें मला. देतें रूप—
—माझ्या इच्छेवाचून मला.
पण
मला नको आहे हा आकार
अन् हें चांदीचें रूप.
मला हवी आहे आषाढांतील शेतांची
बीजांना रोप करण्याची शक्ति परत मला,
जी पिकांच्या सोनेरी तुऱ्यांत
ऐश्वर्य मानते.

## दिलासा

किती तरी दिवसांनी
ऊन पडलें प्रसन्न !
हसूं लागल्या सावल्या
होत्या उदास विषण्ण !

चार दिवस सारखी
होती पावसाची झड;
पंख घेऊन पोटाशीं
होती स्तब्ध धडपड !

निळें नितळ आकाश
तुझें सये, नवेपण !
किती छळलें झाडीला
वाऱ्यापावसाने पण !

गळणारें माझें घर
आहे टाकीत उसासा;
ओसरींत येऊनिया
ऊन देताहे दिलासा !

# स्वच्छ जळामध्ये

स्वच्छ जळामध्ये
ढगाची सावली :
डोळ्यांत बाहुली
जशी कांही.

स्नेहाळ दृष्टीने
सृष्टि बघे मला;
काय द्यावें तिला
प्रश्न पडे.

माझ्या भावनांचा
सृष्टि हा आरसा,
चंद्र ही लालसा
जशी माझी.

## शांति

शांतीची हातांत घ्यावी
नरम थोडी वाळू...
शेजारची पोर किती
गोड आहे शाळू.

घराचीं दारेंही माझ्या
सर्व आहेत खुलीं;
घरोघर पेटलेल्या
माझ्यासाठीच चुली.

समोरील ग्रंथसुद्धा
वाचावा न वाटे;
कुत्रा बनुनिया मन
जीवनांग चाटे.

शांतीची हातांत घ्यावी
नरम थोडी वाळू...

## जिथं सर्व माझंच आहे

काय नाकारावं आणि काय स्वीकारावं
जिथं सर्व माझंच आहे.

माझींच आहेत हीं हाडं रस्त्यावर टाकलेलीं;
माझ्याच लोकरीची आहे शाल
तुवां पांघरलेली.

माझंच आहे हें आकाश
जरी बोलत नाही माझ्याशीं;
माझाच आहे हा प्रकाश
जरी काजळी उराशीं.

विजयाचें गीत गातों मी हर्षोन्मादांत
तरी आंतून कष्टी असतों :
कारण असतों सैन्यांत
पराजितांच्या.

आंतील झुंजच मी बाहेर बघतों
दोन रेड्यांची;
अजूनपावेतो मैत्री नाही जमली
माझ्या दोन पायांची.

काय नाकारावं आणि काय स्वीकारावं
जिथं सर्व माझंच आहे.

## मीच पिसा

कुठेतरी वर उंच
तरळत असतों
तुमच्या दृष्टीनं मी तेव्हा
पायतळीं असतों.

तुम्हीं फोडलेलीं खेळणीं
जुळवीत असतों
म्हणून तर तुमच्या मी
खेळण्यांत नसतों.

तुमचें अर्धं जीवन
मी जगतों; म्हणून तर
मला लाभतो वनवास,
तुम्हाला सुखाचें घर.

माझें कांहीच म्हणणें नाही.
आहां तसे सुखांत असा.
तुमच्या किल्मिषांचें दुःख
वागवितों, मीच पिसा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## मलाहि वाटतं

मलाहि वाटतं गावीं फुलांचीं गाणीं;
परंतु जिभेला माझ्या दंश केला कुणीं.
'यंत्रसंस्कृतीचा जय' शब्द उच्चाराया
जातों; पडतों पण नियतीच्या पाया.
असा मी मानवपुत्र : आजच्या संस्कृतीचा
वडविला इतिहास, गमावली वाचा !

## भरजर

कांहीच नसतां आगेमागे
विणीत बसलों सुंदर धागे
कधि अनुरागें, कधि लोभानें;
मोहित होतों मधु गाण्यानें.
हृदय पिंजरा सोडुन येतें
अन् इथल्या सर्वांचें होतें;
परंतु माझा मीच नसें जर
वस्त्राविण नुसती ही भरजर.

## प्रेम केलें कुणीं

प्रेम केलें कुणीं
कुणिं दगड मारिले;
जिंकिलें कुणिं कुणा
कुणिं सर्वस्व हारलें;
दगड पूजिले कुणीं
कुणिं नुसता अवकाश;
कुणिं रोखून धरिलें,
कुणीं उधळिले श्वास.
जीवनेश्वराची ही
मिरवणूक चालली :
कुणी मिसळलें तींत,
कुणिं दुरून पाहिली.

## हे रस्ते सुंदर

हे रस्ते सुंदर
कुठेतरी जाणारे
अन् पक्षी सुंदर
कांहितरी गाणारे.

तूं उगाच बघतो
फैलावाचा अंत;
किती रम्य वाटतो
कैलासांत दिगंत.

हे पक्षी सुंदर
गाति निरर्थक गाणें;
मी निरर्थकांतिल
भुलतों सौंदर्याने.


राठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम 36663 दि:
क्रमांक 2446 कॉ दि

## संगमावर

पानांवाचून झाड हसतं
नुसतंच फुलांनी :
दारिद्र्यांत माणूस हसतो
जसा की मुलांनी.

मीसुद्धा हसतों आज
विनाकारण, विनायास :
प्रेम जन्मण्याआधींचे
विसरलों सर्व प्रयास.

जडाच्या नि चैतन्याच्या
आलों आज संगमावर;
दुःखा, चल आपुलें तूं
येथील वास्तव्य आवर.

## साक्षि उद्याच्या

झोपी गेले अंतर्ज्ञानी,
अभिमान्याही लागे खांदा;
फळाफुलांनी बहरुन येती
वारंवार कशाला फांद्या ?

तत्त्वज्ञानें विसरुन सारीं
फक्त जाणतों जिवंतता ही;
चिरंजीव क्षण अग्राह्यतुका
मन असतें इवलें दगडालाही.

द्वाही गळते पाचोळ्यासम,
कुणी देइना कसली ग्वाही;
निर्मितिच्या पण नगरीमध्ये
पागल तो जो स्मशान पाही.

दैवत नाही कुणी परंतू
या नयनांतिल ज्योती माझ्या
पथप्रदर्शक; साक्षि उद्याच्या
वंशवेलिच्या कलिका ताज्या.

## महाद्वार

तुम्ही बघा रेताडांत अपुलें मुख,
नदीच्या मी झुळझुळत्या जळांत बघेन :
ज्याच्यासाठी तुम्ही इतके विवश होतां
त्याच सत्याच्या सान्निध्यांत मी हसेन.

नाही खाई राहिलेलें माझें मन :
उंबरठा तो आहे एक प्राणाचा;
अतिथि बनून आलेला प्रत्येक किरण
येथील रहिवासी होतो ज्ञानाचा.

प्रत्येक द्वार महाद्वार जीवनाचें
नाही झालें जरी दर्शन गाभाऱ्याचें;
दिशा कळली हेंच काय थोडें झालें ?
सोडूं नको मात्र सोबत माझे वाचे.

## यावें ऋतुराज

यावें ऋतुराज. स्वागत.
वाऱ्या, पळव पाचोळा.
बघितलीस ना ही बाग
चिमली सारी :
लक्करांत शेवंती
टाकुनी वस्त्रें जरतारी
अन् गुलाब झिंगुन पडला
पिऊनी शराब.
यावें ऋतुराज. स्वागत.
या कलिकेला सांगा कांही.
म्हणते, मी उमलणार नाही;
सूर्याला फुलवा
घालुनी फुंकर.
थंडीने झालें अशक्य आम्हां
जिणें खरोखर.
हास्यांत बदलवा
परिणत पृथ्वीचा गहिवर.
यावें ऋतुराज. स्वागत.

# हा बहर फुलांचा

हा बहर फुलांचा
आणि मनाची मुक्त लहर;
माझे अनवाणी पाय
उन्हाचा तृतीय प्रहर !

गोडवा तुझ्या प्रीतीचा विपुल
तृप्त तरी अजुनही व्याकुळ :
कोकिळ गाते गान कुठे दूरांत.

वसंतकाळ जीवनीं, उपवनीं;
उचलीना जड माझें पाऊल !

हा बहर फुलांचा
आणि मनाची मुक्त लहर.

## सौम्य मृदु बहार

भावनेचा धबधबा नसेल कुठे
पण सौम्य मृदु बहार
सर्वत्र आलेली दिसते.

उन्हासारखं तुझं स्मित
हिरवळींवर वागडतांना पाहून
माझेहि काचेचे डोळे
त्वचेचे होतात.

आता ओंजळीलाही
वेगळं अस्तित्व उरलं नाही;
धारेंतच उतरल्यावर
प्रत्येक जागा आता अथांग वाटते
पाय टेकूं गेल्यावर.

भावनेचा धबधबा नसेल कुठे
पण सौम्य मृदु बहार
सर्वत्र आलेली दिसते.

# पळसबन हुशार

पळसबन हुशारः
लाजली दुपार
पाहुनिया सडकेने
जाणारी मोटार.

सावल्यांत जाउनिया
दडली ती आंत;
पदर तियेचा पडला
पिवळा शेतांत.

वाराही रमणीच्या
तनुसा हलका;
कुजबुजतो गाऱ्हाणें
पक्षि बोलका.

## वनफूल

वनफूल :
त्याला आवडते धूळ;
गाई उदास गाणें;
कुठेच येणें ना जाणें :
घालवितें शूल
वनफूल.

बाजूला वाहते नदी;
वारा विचारतो कधी;
पृथ्वीवरी आकाशाचें
निनांवी हें मूल :
वनफूल.

गोड रंग, उग्र वास;
तयाचा न कुणा त्रास.
कधी कधी पांथाला
पडते पण भूल.
वनफूल.

## येरझारा

अंतरीं बाहेरी
पुन्हा येरझारा;
कुठलाच वारा
सोसवेना.

अंतरांत घुशी,
बाहेर अहंता;
सांग भगवंता
स्थान तुझें.

नाही आत्मज्ञान,
वस्तुज्ञान मंद;
कुलुपांत बंद
प्राण माझा.

कुलुप लावुनी
गेला भगवंत;
पडवींत संत
अर्धमेला.

## मासे

अगदी तळाशीं असलेले छोटे मासे
वर आले, मोठे झाले.
वरच्या मोठ्यांपैकी कांही
काठाला लागले, मृत झाले.
कांही मोठ्या माशांनी मात्र
मोठं झालेल्यांची कास धरली
अजून मोठं होण्याकरिता.
आता छोट्यांना खाऊन मोठे जगणार नव्हते.
दोघांनी एकत्र जगावं म्हणून
बाहेरून 'एऽड' येऊं लागली.
वेड लागलें लाल माशांना :
स्वतःभोवती गिरक्या घेऊन
टीका-प्रतिटीकेच्या दातांनी
स्वतःला चावूं लागले;
कांही तर गळा(य)ला लागले.
बुद्धिवादी कांही पगारी मासे
बिगार टाळीत हिंडूं लागले;
प्रमोशनाच्या फिकरींत
कांही उष्टे घास गिळूं लागले.
क्रांती झाली हां, गडे हो, क्रांती झाली :
पब्लिक पार्कांत बडबडसुद्धा पुष्कळ झाली.
संत परागंदा झाले
आणि गदा आली कलावंतांवर;
कांही विदूषक बनले :

बिचारे करतील काय !
कांहींचीं पोटं उघडीं पडलीं;
पळायला नव्हते पाय.
कांही वाळूंत नुसते तडफडूं लागले.
अगदी तळाशीं असलेले छोटे मासे
वर आले, मोठे झाले.

# वस्ती कशी सुबक सुंदर

रेडियोचे सूर
ऐकूं येतात सर्वत्र;
माणसें मात्र येत नाहीत
कधीच एकत्र.
दुरून बघतात
हालचाली वाटचाली;
हृदय जर वरखाली झालें
तर पंखा लावतात.
चोरून जगतात
भावभावना.
वस्ती कशी सुबक सुंदर :
समज आहे रस्त्यांनाही
कुठून जावें याचा
आणि माणसांनाही
कुणाशीं बोलावें याचा.
वस्ती कशी सुबक सुंदर.

## यात्रा

जाऊन या
यात्रेला जाऊन या :
कीर्तीची यात्रा
धनाची यात्रा
पदांची यात्रा
बसा बसा गाडींत;
भाग घ्या चढाओढींत.

तूं रे म्हाताऱ्या
कशाला चढतोस;
जावयाचें नाही तरी
जागा अडवतोस;
त्यापेक्षा पडून रहा
इथेच फलाटावर;
तुझा समाचार घेऊं
आम्ही परत आल्यावर.

# चिंतक

कसं काय चिंतक
कुठवर आली चिंता ?
आता तर कुठे
कळों आली अहंता.

कसं काय चिंतक
ईश्वर आहे की नाही ?
भरली कवितेची वही
कांही सांगतां येत नाही.

कसं काय चिंतक
युद्ध होणार की नाही ?
चिंतक पडले विचारांत
म्हणाले, माहीत नाही.

कांहीच माहीत नाही,
मग कसले चिंतक ?
त्याहून तर बरे
आम्ही हितचिंतक.

# अजून काय झालं

अजून काय झालं :
नुकते कुठे पडले थेंब
फांदीतलं पाखरू
ओलंचिंब नाही झालं :
अजून काय झालं.
आता तर कुठे
डोळयाला भेटतो डोळा :
लाजेच्या विरळ ढगीं
चंद्र लपे वेळोवेळा;
प्रीतीला फुटलें नाही
नाक, कान आणि डोळा;
आता तर कुठे नाव
ओठांवरी आलं.
अजून काय झालं.

## अशांत वारा

अशांत वारा आज कशाने
छळतो या पदराला;
लता मानुनी या देहाला
करूं बघतो तो चाळा.
बघितलेंस का नाही लपल्या
पदराआंतिल बाळा;
नाही नवी कोवळी पोर मी
वैवाहित ललना.
अशांत वाऱ्यानें कां उडते
माझी मग ही दैना !

## नाच

नाचे वनांत मोर
थुई थुई थुई;
आलें आभाळ म्हणत
भुई भुई भुई.

मेघगर्जनेच्या मंद
खर्जांतल्या लयी;
वारा धरुनिया सूर
सुईं सुईं सुईं.

मेघ सांगतो वरून
थांब थांब थांब;
वर्षा पावलं टाकी
लांब लांब लांब.

आधी थेंब आले पांच,
मग सुरू झाला नाच;
नाचतांना एक झाले
आकाश मही.

नाचे वनांत मोर
थुई थुई थुई.

# तूंही तूंही तूंही

नाचे वनांत मोर
थुई थुई थुई;
माझ्या दृष्टिसमोर
तूंही तूंही तूंही.

सुटला सोसाट वारा
सुइँ सुइँ सुइँ;
आल्या धावत धारा
भुइँ भुइँ भुइँ.

चिंब झालें गांवरान,
गेलें दिशाभान;
मनसतार वाजते :
तूंही तूंही तूंही.

## परत

मृत्यू घेतो चावा :
धावा धावा धावा.
धावणारे धावतात,
ॲम्ब्यूलन्स आणतात;
स्मशानांतून परत
येतात हासतखेळत.

# अभिवादन

माणसाच्या मुक्तीचे अग्रदूत आम्ही :
नवी टवटवी आम्हाला प्रथम दिसते;
मुक्त झालेल्यांच्या पायीं नवीन बेड्या पडल्या
तरी आमच्या पायांतील बेडी आधी गळते

म्हणून तर मित्रा, तुला हजार मैलांवरून
अभिवादन करतों; कारण ओळखतों तुला.
दुःख अतोनात असलें माझ्या देशांत तरी
गुलाब सुंदर आहेत; हा घे पुष्पगुच्छ तुला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा
अनुक्रम ३८७८२ वि:
१५५८

# भ्रम

स्टेशनचे दिवे,
चमकणारे रूळ;
निघुन गेली गाडी :
जसा पोटशूळ.

तुरळक माणसें,
विरळक बाक;
अंधारांत पूल :
जसें काही नाक.

दिवे जसे डोळे
टकमक पाहात;
कांहीच यांच्या नाही
लक्षांत राहात.

पिवळा नि तांबुस
स्टेशनचा तम :
वेदनेनंतरचा
वेदनेचा भ्रम.

# सूर्याचीं पिलें हीं

सूर्याचीं पिलें हीं :
इवल्या इवल्या ज्योती;
लुकलुकत विचारतात,
अंधार किती, अंधार किती ?

अंधार प्राचीन महान्,
तुम्ही तर इतक्या लहान;
सांगा टिटवीची तहान
समुद्र पिणार किती ?

मानवाचा अहंकार
खणून काढील अंधकार;
वर्षें लागतील हजार.
तेथवर तुम्ही तरी
वाट पाहाणार किती ?

आहां तशा उभ्या राहा;
झोपूं नका, जाग्या राहा;
माझ्यासम कवि एक
याहून सांगणार किती ?

सूर्याचीं पिलें हीं :
इवल्या इवल्या ज्योती.

# सुखाचे सोबती

सुखाचे सोबती
दुःखांतही राहो;
कोसळो हें नभ
भिंती उभ्या राहो.

आपलेपणाने
हात हातीं आले :
शिंपल्यांत कैसे
मोती गोळा झाले ?
अंतापावेतो हे
हात हातीं राहो.

गगनाच्या विटा
मोजणारे नर;
येथवरी आलों
त्यांच्या शब्दांवर.
विटेवरी माथा
पाय हातीं राहो;
सुखाचे सोबती
दुःखांतही राहो.

## रथा जुंपिलों मी

इथला असूनी
इथला न झालों;
सांगूं न शकलों
कोण गांवीं आलों.

देऊळ, बंगला
चाळ वा सराई :
वाटे कुठे ना
वसती करावी.

माझा तुझा कोण
वैरी नि त्राता;
रथा जुंपिलों मी
तुझ्या जगन्नाथा.

REFBK-0014806
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नोंद दि: ...